N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): चंद्रपुर **P.S.**(ठाणे): चिमुर **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0241 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 18/08/2022 16:51 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 11/08/2022

**Date To** ( दिनांक पर्यंत): 18/08/2022

**Time From** (वेळेपासून): 10:20 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 11:17 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 18/08/2022 **Time** (वेळ): 16:15 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 023 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 18/08/2022 16:51 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 2 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पार्कींग शेड जवळ,शासकीय औद्योगीक प्रशीक्षण , संस्था चिमुर,चिमुर, 442903

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रोहीणी किशोर पत्तीवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1995 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वेलकम कॉंलनी,नेहरु वार्ड चिमुर,चिमुर,चिमुर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वेलकम कॉंलनी,नेहरु वार्ड चिमुर,चिमुर,चिमुर,चंद्रपुर,महाराष्ट्र,442903,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9049918938

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शांताराम किसनदास राठोड | | | 1. शासकीय औद्योगीक प्रशीक्षण,संस्था चिमुर,चिमुर,चिमुर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रशांत वसंतराव वांढरे | | | 1. शासकीय औद्योगीक प्रशीक्षण,संस्था चिमुर,चिमुर,चिमुर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत-442903 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 24 चलनी नोटा | 12,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 12,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पो स्टे चिमुर जि.चंद्रपुरदिनांक:- 18/08/2022मी कु. रोहिणी किशोर पत्तीवार, वय 27 वर्षे, धंदा नौकरी, गणित व अभियांत्रिकी चित्रकला निदेशक, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर रा. वेलकम कलनी, नेहरू वार्ड,चिमुर ता.चिमुर जि.चंद्रपुर येथे राहते आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिमूर येथे तासिका तत्वावर गणित व अभियांत्रिकी चित्रकला निर्देशक म्हणुन काम करीत आहे. मी शासकीय आद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमूर येथे दिनांक 14/02/2022 रोजी अर्ज केला होता त्यानुसार माझी सदर औद्योगीक प्रशिक्षण संस्थेमध्ये दिनांक 16/02/2022 ते 31/08/2022 या कालावधीकरिता तासिका/मानधन तत्वावर गणित व अभियांत्रिकी चित्रकला निदेशक म्हणुन नियुक्ती झाली. त्याकरीता मला गणित व अभियांत्रिकी चित्रकला या विषयांकरिता प्रती तास 250/-रू. प्रमाणे एकत्रित मानधन रूपये 15,000/-रू. प्रतिमाह अथवा प्रत्यक्षात घेतलेल्या तासिका यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम मानधन म्हणुन मला देय आहे. त्याप्रमाणे माहे फेब्रुवारी/2022 ते मे/2022 पर्यंतचे एकूण 50,200/-रूपये मानधन शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर येथुन मला मिळालेले आहे. दिनांक 09/08/2022 रोजी शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर येथे प्रवेश प्रक्रीयेचे कामकाज सुरू असल्याने मी तिथे गेली असता गै.अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमूर हे मला भेटले व म्हणाले की, मी तुमचे माहे फेब्रुवारी/2022 ते मे/2022 पर्यंतचे चार महिन्याचे मानधन काढुन दिले आहे. त्याचे मोबदल्यात तुम्हाला माझेकरीता 12,000/-रूपये दयावे लागतील. आणि तुम्ही जर पैसे दिले नाही तर मी तुमचे उर्वरित पुढील तीन महिन्याचे मानधन काढणार नाही असे म्हणाल्याने मी त्यांना नाईलाजास्तव होकार देवुन दोन-तीन दिवसानी येवुन भेटते असे म्हणुन परत आली. माझी गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी दिनांक 10/08/2022 रोजी माझे मोबाईल क्र. 9049918938 नी सायंकाळी 06/00 वाजता दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील श्री. गुरनुले साहेब, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर यांचे मोबाईल क्र 8830550286 वर एका लोकसेवकेविरूध्द लाच मागणी संबंधाने तक्रार असल्याबाबत कळविले व त्यांना वरीलप्रमाणे सर्व हकीकत सांगितली. त्यावरून श्री. गुरनुले सा. यांनी मला दिनांक 11/08/2022 रोजी सकाळी ठिक 08/45 वा. चिमूर येथील एम.आय.डी.सी. परिसरात येवून थांबून राहण्याची समज दिली व ते सुध्दा कार्यालयीन स्टाफ व पंचासह सकाळी 8/50 वा. पर्यंत एम.आय.डी.सी. चिमूर परिसरात येत असल्याचे सांगितले. त्यानुसार मी दिनांक 11/08/2022 रोजी सकाळी 8/45 वा.

दरम्यान चिमूर येथील एम.आय.डी.सी.परिसरात सुरक्षित ठिकाणी हजर असताना श्री. जितेंद्र गुरनुले साहेब हे त्यांचे कार्यालयीन स्टाफ व पंचासह मी हजर असलेल्या ठिकाणी आले. त्यानंतर मी त्यांना परत एकदा सविस्तर हकीकत सांगितली असता श्री. गुरनुले साहेब त्यानी मला लेखी तक्रार देण्याचे सांगितले. माझा गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर जि. चंद्रपूर यांचेशी कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. मला लाच मागणाऱ्या गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर जि. चंद्रपुर यांचेविरूध्द कार्यवाही होण्याकरीता लाचरक्कम म्हणुन आवश्यक असलेली रक्कम माझे वैयक्तिक बचतीतुन जमा झालेले 12,000/- रू. आपणाकडे लाचरक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. तरी माझे तक्रारीवरुन मला माझे फेब्रुवारी/2022 ते मे/2022 पर्यंतचे चार महिन्याचे मानधन काढून दिल्याचे मोबदल्यात 12,000/-रू. लाचेची मागणी करण्याऱ्या गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर, जि.चंद्रपूर यांचेविरुध्द कार्यवाही होणेबाबतची लेखी तक्रार दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी त्यांचे सोबत हजर असलेल्या दोन्ही पंचाची व स्टफची माझेसोबत ओळख करून दिली. श्री. गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचाना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या लेखी तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व श्री. गुरनुले साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर श्री.गुरनुले साहेब यांना मी सापळा कार्यवाहीसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 12,000/- (रू. 500/- दराच्या 24 चलनी नोटा) दिलेल्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे पो.क. अमोल सिडाम यांचे हस्ते गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रकमेस अँथ्रसिन पावडर लावली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी दिलेल्या सूचनेवरुन ना.पो.क. संदेश वाघमारे यांनी व्हईस रेकर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या). त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर, जि. चंद्रपूर यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यांचे सुचनेवरुन ना.पो.क. संदेश वाघमारे यांनी व्हईस रेकर्डर सुरु करून व्हईस रेकर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन म.पो.अं. पुष्पा काचोळे यांचे हस्ते व्हईस रेकर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे टी.व्ही.एस. स्कुटी वेगो वाहन क्र. एम.एच.34-ए.एल. 8131 नी पंच क्र. 01 यांचेसह मला माहीत असलेले गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर येथे पडताळणी करीता पाठविले. पडताळणी दरम्यान गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर यांनी मला नाही एवढे जर समजा मी जर काढले नसते तर मग काय केल असतं.ते पैसे जर मी काढले नसते तर मग काय केल असंत, मग कुठुन केल असता, साधा लजीक आहे. देवुन द्या, कोणाकडे तरी देवुन ठेवा, त्यांच्याकडे द्या देवुन देतात ते माझ्याकडे बरोबर. चुकीच आहे ते मले सांगायचच नाही, तस नसते ते, ते तुमचे, तुमचे नव्हतेच, तुमचा त्याच्यावर अधिकार नव्हता. मी काही सांगत नाही, जेवढे बोललो ते, तुम्ही भेंडारकर ले कन्टक्ट करा, भेंडारकर सांगतिल. असे म्हटले. तेव्हा गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर, यांनी 12,000/- रुपये लाचरक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने पडताळणी कार्यवाही करुन परत आलो व पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आले. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंच क्र. 01 व 02 यांचेसमक्ष व्हईस रेकर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर यांनी मला माझे फेब्रुवारी/2022 ते मे/2022 पर्यंतचे चार महिण्याचे मानधन काढून दिल्याचे मोबदल्यात 12,000/-रू. लाच रकमेची मागणी करून श्री भेंडारकर किंवा इतर (तासिका/मानधन तत्त्वावर) निदेशक सर यांचे मार्फतीने स्विकारण्याची खात्री करण्यात आली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी मला श्री भेंडारकर नावाचा ईसम कोण आहे याबाबत विचारले असता मी सांगितले कि, श्री भेंडारकर हे शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर येथे (तासिका/मानधन तत्त्वावर) निदेशक या पदावर कार्यरत असल्याचे सांगितले. मला गै.अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर यांनी लाच रक्कम घेवून शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर येथील श्री भेंडारकर किंवा इतर (तासिका/मानधन तत्त्वावर) निदेशक सर यांचेकडे देवुन देशील असे सागितले असल्याने शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर येथील श्री भेंडारकर किंवा इतर (तासिका/मानधन तत्त्वावर) निदेशक सर यांचेकडे पाठवून गै.अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर यांचेविरुध्द लाचेचा सापळा आयोजनाचा श्री गुरनुले साहेब व दोन्ही पंचांनी निर्णय घेतला. त्यावरुन गै. अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय आद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर यांचेविरूद्ध पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी मला अँथ्रसिन पावडर लावलेली 12,000/- रुपये लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे काळ्या बग मध्ये ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गै.अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर चे बाहेर दर्शनी भागी येवुन माझे डोक्यावर बांधलेली स्कर्फ काढुन डाव्या हातात ठेवुन लाचरक्कम देण्याबाबतचा ईशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य यांना इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन नापोक. संदेश वाघमारे यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन म.पो.अं. पुष्पा काचोळे यांचे हस्ते व्हाईस रेकर्डर माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही. अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे टी.व्ही.एस.स्कुटी वेगो वाहन क्र. एम.एच.34-ए.एल. 8131 नी पंच क्र. 01 यांचेसह शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, चिमूर येथे गेले असता सदर सापळा कार्यवाहीमध्ये गै.अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर यांनी तसे वाटते तुम्हाला पण आम्हाला सगळे दिसतात लोक, मी तुम्हाला सांगले ना, आणले असेल तर भेंडारकरकडे द्या नाहीतर तर देवुन द्या ना मग, पुर्ण थोडीही मागुन राहिलो आहे. आपले आपले जे, असे म्हणाले. तसेच श्री वांढरे कडे दे मग, वांढरेले पाठवितो मी,थांबुन जा असे म्हणाले असता त्यावर मी ते दोघेही दिसत नाही असे म्हणाले असता गै.अ. राठोड सर यांनी भेंडारकर जेवण करायला गेला आहे माझी हिंगणघाट ची बस आहे असे म्हणुन गै.अ. राठोड सर, गटनिर्देशक हे शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिमुर येथुन निघुन गेले. गै.अ. राठोड सर, गटनिदेशक यांनी लाच रक्कम श्री भेंडारकर किंवा श्री वांढरे यांचेकडे देण्यास सांगुन स्वत: लाच रक्कम न स्विकारल्याने तसेच भेंडारकर किंवा वांढरे हे हजर नसल्याने मी नियोजित ठिकाणी चिमूर येथील एम.आय.डी.सी. परिसरातील सुरक्षित ठिकाणी परत आली. तेव्हा सापळा कार्यवाहीतील श्री. गुरनुले साहेब व कर्मचारी सुध्दा माझे मागेमागेच पोहचले. तेव्हा लगेच श्री गुरनुले सा. यांचे सुचनेवरुन माझे गळ्यातुन व्हाईस रेकर्डर म.पो.अं. पुष्पा काचोळे यांचे हस्ते काढून घेतले व गै.अ. राठोड सर, गटनिदेशक यांचेकडे जावुन सापळा कार्यवाही न झाल्याने परत आल्याबाबत पंच श्री. बोधित्व रामटेके यांनी प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर नापोक संदेश वाघमारे यांनी व्हईस रेकर्डर बंद केले. त्यावरुन श्री. गुरनुले सा. यांनी दिनांक 11/08/2022 रोजी कार्यवाही स्थगित ठेवुन पुढील कार्यवाही ही मला गै.अ. राठोड सर, गटनिदेशक, शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था,

चिमूर, यांनी सांगितलेल्या श्री भेंडारकर(उर्वरित फिर्याद मुळ फिर्याद प्रमाणे)

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले)**:** manoj changorao gabhane(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:**

**Rank** (पद)**:**

**No.**(क्र.)**:** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**:**

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ)**:**

स्टे.डा.अंमलदार
पो.स्टे चिमूर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव)**:** manoj changorao gabhane

**Rank**(पद)**:** I (Inspector)

**No.**(सं.)**:**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची | **Complexion** (रंग) | **Identification Mark(s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा/बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)